नि.दि.दा.क्र. : ८०/२०१५
अग्रवाल भवन वि. मोतीराम
नि.१९

---

**<u>साक्षीदार क्र. १ वादीकरीता ते स्वत:</u>-**

संतोष शंकरलाल अग्रवाल
वय-६५ वर्षे, व्यव.-खाजगी,
लालाओली कामठी, तह.: कामठी,
जिल्हा-नागपुर

**<u>साक्षीदाराचा सरतपास वादीकरीता त्यांचे अधिवक्ते श्री. आर. आय. अग्रवाल शपथेवर सुरु:</u>**

आता मला माझे प्रतिज्ञापत्र नि. १९ दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला आहे. तो बरोबर आहे. आता मला दस्त क्र. १ दाखविण्यात आले. ते अग्रवाल भवन सोसायटीचे सोसायटीज रजिस्ट्रेशन चे नोंदणी प्रमाणपत्र दिनांक २१/११/१९५७ चे साक्षांकित प्रत आहे. त्यावर माझी सही आहे. सदरचे दस्ताला नि.३९ देण्यात येते. आता मला दस्त क्र. २ दाखविण्यात आले. ते अग्रवाल भवन सोसायटीचे बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्टखाली दिलेले नोंदणी प्रमाण पत्र दिनांक १६/०८/१९६२ ची साक्षांकित आहे. त्यावर माझी सही आहे. सदरचे दस्ताला नि. ४० देण्यात येते. आता मला दस्त क्र. ३ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे मी त्या कमिटीचा अध्यक्ष असल्याबाबतचे अग्रवाल भवन सोसायटी येथील इलेक्शन कमिटीने दिलेले प्रमाणपत्र आहे. त्यावर माझी अक्ष्यक्ष

म्हणुन सही आहे. त्यास नि.४१ देण्यात येते. आता मला दस्त क्र. ४ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे अग्रवाल भवन सोयटीने ॲड. राकेश अग्रवाल यांना लिगल ॲडवाईझर म्हणुन नियुक्त केल्याबाबतचे पत्र आहे. त्यावर माझी अध्यक्ष म्हणुन सही आहे त्यास नि. ४२ देण्यात येते. वरिल दस्तांना ओळखीसाठी निशानी देण्यात आल्या आहेत.

आता मला दस्त क्र. ५ दाखविण्यात आले. ते सोसायटीचे बॉयलॉज आहेत. सदरचे दस्तास वस्तु 'अ' देण्यात येते. आता मला दस्त क्र. ६ दाखविण्यात आले. ते सोसायटीचे नियम आहेत. सदरचे दस्तास वस्तु 'ब' देण्यात येते.

आता मला दस्त क्र. ६-अ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे ॲड. राकेश अग्रवाल आणि ॲड. श्री. पुडके यांना सदरची केस पाहण्याकरिता नियुक्त केले. सदरचे दस्त हे मुळ प्रत आहे. त्यावर अध्यक्ष म्हणुन माझी सही आहे. त्या दस्ताला नि.४३ देण्यात येते. आता मला दस्त क्र. ७ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे प्रतिवादी यांना वादमिळकत खाली करण्याबाबत दिलेली नोटीस आहे. सदरचे दस्त हे मुळ प्रत आहे. ज्यावर आमच्या समाजाच्या सर्व लोकांच्या सहया आहेत. त्यावर माझीसुद्धा सही आहे. त्या दस्ताला नि. ४४ देण्यात येते. आता मला दस्त क्र. ८ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे मुळ प्रत असुन डॉ. राकेश मुरली अग्रवाल यांनी त्यांना वादमिळकतीवर दवाखाना उघ ाडण्याबाबत दिलेले संमतीपत्र आहे. सदरच्या पत्रावर ते

मिळाल्याबाबत माझी पोहच वर अध्यक्ष म्हणुन माझी सही आहे. त्या दस्तास नि.४५ देण्यात येते. आता मला दस्त क्रमांक ९ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे मुळ प्रत असुन डॉ. मुक्ता अग्रवाल यांनी त्यांना वादमिळकतीवर दवाखाना उघडण्याबाबत संमतीपत्र दिले. सदरच्या पत्रावर ते मिळाल्याबाबत माझी पोहच वर अध्यक्ष म्हणुन माझी सही आहे. त्या दस्तास नि.४६ देण्यात येते.

आता मला दस्त क. १० दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे सोसायटीद्वारे मिटींगमध्ये पारित करण्यात आलेले ठरावाची साक्षांकित प्रत आहे. त्यावर माझी सही आहे. त्या दस्तास नि. ४७ देण्यात येते. वरिल दस्ताला ओळखीसाठी निशानी देण्यात आल्या आहेत.

आता मला दस्त क. ११ दाखविण्यात आले. सदरचे दस्त सोसायटीद्वारे मिटींगमध्ये इंग्रजी भाषेत पारित करण्यात आलेले ठरावाची मुळ प्रत आहे. त्यावर माझी सही आहे. त्या दस्तास नि.४८ देण्यात येते. आता मला दस्त क्रमांक १२ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे प्रतिवादीस पाठविण्यात आलेली कायदेशीर नोटीस आहे. त्यावर माझे वकील श्री. पुडके यांची सही आहे. त्यास नि. ४९ देण्यात येते. आता मला दस्त क्र. १३, १४ व १५ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे पोष्टाच्या मुळ पावत्या आहेत. त्यास एकत्रितरित्या नि. ५० देण्यात येते. आता मला दस्त

क्रमांक १७ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे आधी दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र. ४९/२००७ मधील नि. १ दाव्याची साक्षांकित प्रत आहे. सदरचे दस्त हे सार्वजनिक दस्त असल्याने त्यानि. नि. ५१ देण्यात येते. आता मला दस्त क्रमांक १८ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे प्रतिवादींनी भाडयाचा भरणा करण्याकरीता परवानगी अर्जाची साक्षांकित प्रत असुन त्यावर न्यायालयाचा आदेश पारित झालेला आहे. सदर दस्त हे सार्वजनिक असल्याने त्यास नि. ५२ देण्यात येते. आता मला दस्त क्रमांक १९, २०, २१, २२ व २३ आता मला दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे नगर परिषदेच्या कराच्या मुळ पावत्या आहेत. सदरचे दस्त हे सार्वजनिक दस्त असल्याने त्यास नि. ५३ ते ५७ देण्यात येते. आता मला दस्त क्रमांक २४ व २५ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे झेरॉक्स असल्याने त्यास वस्तु 'सी' व 'डी' देण्यात येते. आता मला दस्त क्रमांक २६ ते ३० दाखविण्यात आले. हे वादमिळतीचे छायाचित्र असुन त्यास वस्तु 'इ, फ, जी, एच, व आय' देण्यात येते. आता मला दस्त क्रमांक ३१ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे गुप्ता स्अुडिओ यांनी अग्रवाल भवन यांना दिलेले छायाचित्राची बिल पावती आहे. सदरचे दस्त हे मुळ प्रत असल्याने त्यास नि. ५८ देण्यात येते.

आता मला यादी नि. क्र. ३० मधील दस्त क्र. १ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे याचिका क्र. २४९/२०१५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिवाडयाची साक्षांकित प्रत

आहे. सदरचे दस्त हे सार्वजनिक दस्त असल्याने त्यास नि. ५९ देण्यात येते. आता मला यादी क्र. नि. क्र. ३० मधील दस्त क्र. २ दाखविण्यात आले. सदरचे दस्त हे न्यायालयाची अवमानना झाल्याबाबतची याचिका क्र. २४९/२०१५ साक्षांकित प्रत आहे. त्यास नि. ६० देण्यात येते. आता यादी नि.क्र. ३० मधिल दस्त क्र. ३ दाखविण्यात आले. सदरचे दस्त प्रतिवादी यांनी वादमिळकतीच्या बाजुला नविन दुकानाचे उद्घाटन केले त्या समारंभाची पत्रिका आहे. त्यास वस्तु 'जे' देण्यात येते.

साक्षिदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

माझे समक्ष

वा.दा.ब.अ.क.के

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कामठी
दि. ४/०९/२०१७

(श्रीमती. एस.ए.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कामठी